# पारनेर दर्शन

वर्ष ४ , अंक २२४, मंगळवार, १० नोव्हेंबर २०२६ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


### आमदार काशिनाथ दाते यांच्या उपस्थितीत जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांची घोषणा

# राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षपदी वसंत चेडे

## गावागावांत पक्षाची ताकद वाढविण्यासह युवकांना संधी देण्यावर भर

**पारनेर : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पारनेर तालुक्यातील संघटनात्मक नेतृत्वाची महत्त्वपूर्ण जबाबदारी माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. विद्यमान तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या जागी चेडे यांची नियुक्ती करण्यात आली. आमदार काशिनाथ दाते यांच्या उपस्थितीत जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांनी या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. आगामी काळात तालुक्यात पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक व्यापक करणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय निर्माण करणे आणि गावपातळीवर पक्षाची ताकद वाढविणे, अशी महत्त्वपूर्ण जबाबदारी आता चेडे यांच्या खांद्यावर आली आहे. अनुभवी नेतृत्वाला संधी देतानाच पक्षाच्या संघटनेत नव्या कार्यकर्त्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न या नियुक्तीतून दिसून येत आहे.

### संघटनात्मक बदलातून पक्षाला नवी दिशा

पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटना अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने तालुकाध्यक्षपदावरील हा बदल महत्त्वपूर्ण मानला जात आहे. विक्रमसिंह कळमकर यांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर नव्या नेतृत्वाची निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे यांच्यावर पक्षाने विश्वास व्यक्त केला आहे. स्थानिक पातळीवरील राजकीय अनुभव, कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क आणि संघटनात्मक कामाची जाण या बाबींचा विचार करून त्यांची निवड करण्यात आल्याचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांनी स्पष्ट केले. तालुकाध्यक्षपद ही केवळ संघटनात्मक जबाबदारी नसून पक्षाची विचारधारा सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. त्यामुळे नव्या नेतृत्वासमोर पक्षातील सर्व गटांना एकत्र आणणे, कार्यकर्त्यांना सक्रिय करणे आणि तालुक्यातील राजकीय व सामाजिक प्रश्नांवर पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडणे, अशी अनेक आव्हाने असणार आहेत.

### पक्षबांधणी करण्याचे आमदार दाते यांचे निर्देश

गावागावांत पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते तयार करणे, बूथस्तरावर सक्षम कार्यकर्त्यांची फळी उभी करणे, पक्षाची ध्येयधोरणे आणि विचारधारा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. संघटनेत युवकांना अधिकाधिक संधी देऊन त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करण्यावरही त्यांनी भर दिला. पक्षातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. जनतेच्या दैनंदिन प्रश्नांशी जोडलेले राहून ते सोडविण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून प्रयत्न झाले पाहिजेत. पदाधिकाऱ्यांनी केवळ पदापुरते मर्यादित न राहता जनसंपर्क वाढवून आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी, असे आवाहन आमदार दाते यांनी केले.

### सर्वांना विश्वासात घेऊन संघटना मजबूत करणार

ते म्हणाले, "पक्षाने माझ्यावर विश्वास दाखवून तालुकाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली, त्याबद्दल पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, आमदार काशिनाथ दाते आणि जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांचे मनःपूर्वक आभार मानतो. आमदार दाते सरांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन पारनेर तालुक्यात आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे." पुढे बोलताना त्यांनी गावपातळीवरील संघटनात्मक कामाला प्राधान्य देण्याचा



### महिला, युवकांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

या नियुक्तीच्या वेळी जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, महाराष्ट्र राज्य वाहतूक सेनेचे अध्यक्ष धनंजय निमसे, जिल्हा उपाध्यक्ष संदीप रोहोकले, सुभाष लोंढे, कार्याध्यक्ष पंढरीनाथ उंडे, युवक तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, हरीषकाका दावभट, जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवती तालुकाध्यक्षा अपर्णा खामकर, सुनीता सोबले, कविता औटी, सोनाली कुलथे, जयश्री शिंदे, रेश्मा गलांडे, नीलम गोसावी, देवराम मगर, सुभाष ठाणगे, अनिल देठे यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### आगामी काळात संघटनात्मक कसोटी


तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर वसंत चेडे यांच्यासमोर पक्षाची गावपातळीवरील संघटना सक्रिय करण्याबरोबरच सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना एका व्यासपीठावर आणण्याची कसोटी असणार आहे. ग्रामीण भागातील प्रश्न, शेतकरी, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर पक्षाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करणे आवश्यक ठरणार आहे. आमदार काशिनाथ दाते यांचे मार्गदर्शन आणि जिल्हा नेतृत्वाचे सहकार्य यांच्या बळावर चेडे तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसला कितपत संघटनात्मक बळ देतात, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## अनुभवी नेतृत्वाकडे जबाबदारी सोपविल्याचा आनंद

जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांनी नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष वसंत चेडे यांच्या निवडीचे स्वागत करताना त्यांच्या अनुभवाचा पक्षाला निश्चितच फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, वसंत चेडे यांच्यासारख्या अनुभवी आणि संघटनात्मक कामाची जाण असलेल्या नेतृत्वाकडे पारनेर तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याचा निश्चितच आनंद आहे. आमदार काशिनाथ दाते सरांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची संघटना अधिक मजबूत आणि गतिमान होईल, असा मला विश्वास आहे. सर्व जुन्या-नव्या पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी करावे. आगामी काळात पक्षाला अधिक बळकटी देत सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी प्रभावीपणे काम करावे.
















# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# डिजिटल अरेस्ट : एक प्रकारचा घोटाळा


## 'आयफोरसी'ने नागरिकांना केले आवाहन

**केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय), पोलीस, सीमाशुल्क विभाग (कस्टम्स), सक्तवसुली संचालनालय (ईडी) किंवा न्यायाधीश व्हिडीओ कॉलद्वारे लोकांना अटक करत नाहीत, असे भारतीय सायबर गुन्हे समन्वयन केंद्राने (आयफोरसी) सांगितले आहे.**




डिजिटल अटकेचे वाढते प्रकार ध्यानात घेऊन आयफोरसीने नागरिकांसाठी जारी केलेल्या सार्वजनिक सूचनांमध्ये याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. अशा प्रकारे कुणी डिजिटल अटक करण्याचा प्रयत्न करीत असेल तर तो एक प्रकारचा घोटाळा आहे, असे 'आयफोरसी'ने स्पष्ट केले आहे. इंटरनेटचा वापर करून केलेल्या अशा प्रकारच्या कोणत्याही इशाऱ्यांना सर्वसामान्य नागरिकांनी बळी पडू नये. नागरिकांनी घाबरून न जाता सजग राहावे, असे आवाहनही संस्थेने केले आहे. अशा प्रकारच्या घटना घडल्यास नागरिकांनी केंद्रीय हेल्पलाइन क्रमांक १९३० किंवा www.cybercrime.gov.in या वेबसाइटवर त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन 'आयफोरसी'ने केले आहे.

सायबर चोर नागरिकांना संपर्क करून पोलीस, इडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, लष्करी अधिकारी असल्याची बतावणी करतात. ड्रग्ज, देशविघातक कृत्य, बनावट पासपोर्ट, दहशतवाद्यांशी आर्थिक व्यवहार, बँक खात्यामध्ये संशयास्पद व्यवहार, आधारकार्ड-सीमकार्डचा गैरवापर झाल्याचे भासवून गुन्हा दाखल झाला असल्याचे सांगितले जाते. तुम्हाला येण्याची गरज नसून आहात त्या ठिकाणी किंवा एखाद्या हॉटेलच्या खोलीत 'डिजिटल अटक' करावे लागेल, असे सांगतात. २४ तासांपर्यंत संबधित नागरिकाला कुणाच्याही संपर्कात न राहता व्हिडीओ कॉलवर बंदिस्त राहायला सांगितले जाते. या कालावधीत व्हिडीओ कॉलमध्ये न्यायालयाचा परिसर दाखवून खटला चालवल्याचे भासवतात. मदत करण्याच्या बहाण्याने, गुन्ह्यात वाचवण्यासाठी पैशाची मागणी केली जाते.




### २४ तासांत एक कोटी वाचवले

मुंबई पोलिसांनी काही दिवसांपूर्वी १९३० या सायबर हेल्पलाइनवर आलेल्या डिजिटल अटक आणि अन्य सायबर फसवणुकीच्या तक्रारींमध्ये २४ तासांत १,०१,५८,७२७ रुपये इतकी रक्कम वाचवली. तत्काळ तक्रारीमुळे नागरिकांची रक्कम वाचवण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२४ मध्ये आतापर्यंत मुंबई सायबर पोलिसांनी वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये सुमारे ११४ कोटी रुपये वाचवले आहेत.

# एआय मॉर्फिंग....

**मोबाईल तंत्रज्ञान अधिक प्रगत आणि वेगाने विकसित होत असून, मोबाईलमध्ये 'एआय तंत्रज्ञान' अद्ययावत करण्यात आले आहे. त्यामुळे फोटो मॉर्फिंगसह अनेक कामे सोपी झाली आहेत. मात्र, एआयमुळे सहज सोप्या पद्धतीने होणाऱ्या फोटो मॉर्फिंगसंदर्भातील गुन्ह्यांच्या तक्रारींची वाढती संख्या पाहता पोलिसांच्या सायबर विभागासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे.**

- पुष्पगुच्छाऐवजी येतोय मद्याचा प्याला : मोबाईलमध्ये असणाऱ्या तंत्रज्ञानामुळे फोटो मॉर्फिंग करणे सोपे झाले आहेत. एखाद्याचा पुष्पगुच्छ देतानाचा फोटो एडिट करून पुष्पगुच्छ ऐवजी हातात मद्याचा प्याला ठेवता येतो. यासह अनेक आक्षेपार्ह बदल एका क्लिकवर करता येतात. यापूर्वी अशा प्रकारे मॉर्फिंग करण्यासाठी फोटोशॉपचा वापर केला जात असे; मात्र जाणकार मंडळीच त्याव्दारे मॉर्फिंग करू शकत होती. आता मोबाईलमध्ये आलेल्या एआय सुविधेमुळे कोणीही एका क्लिकवर फोटो मोर्फिंग करू शकते. जे पुढील काळात धोकादायक ठरणार आहे.
- बदनामीसाठी वापर : 'एआय'च्या मदतीने केलेले मॉर्फिंग सहजपणे ओळखता येत नाही. फोटो एडिट करताना एआयकडून अनेक छोटे छोटे बदल आपोआप केले जातात. सध्या प्रत्येकाचे फोटो सोशल मीडियावर उपलब्ध आहेत. या फोटोंमध्ये बदल करून बदनामीदेखील केली जाऊ शकते. त्यामुळे सोशल मीडियावर फोटो अपलोड करताना यापुढे अधिक खबरदारी घ्यावी लागणार आहे.
- एआय जनरेटेड कंटेट : एआयच्या मदतीने एडिट केलेल्या फोटोच्या खाली एआय जनरेटर कंटेंट असा मार्क येतो. मात्र, फोटोखाली अगदी कोपऱ्यात असलेला हा मार्क फोटो क्रॉप किंवा इतर टूलच्या मदतीने सहजरित्या घालवता येतो. ज्यामुळे फोटो एडिट आहे, की खराखुरा, हे समजत नाही.

### खबरदारी घ्या

- फोटो 'मॉर्फ' करून बदनामी किंवा फसवणूक केल्याच्या सायबर विभागाकडे दररोज तक्रारी येत आहेत. यातच आता मोबाईलमध्ये आलेल्या एआयच्या मदतीने फोटो मॉर्फिंग करणे सोपे झाले आहे. मात्र, याचा दुरुपयोग होण्याची जास्त शक्यता आहे. एखाद्याचा फोटो आक्षेपार्ह पद्धतीने मॉर्फ करून व्हायरल करणे, हा कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे फोटो एडिट करण्यासाठी एआयचा वापर करताना खबरदारी घेणे गरजेचे आहे, असे सायबर पोलिसांनी म्हटले आहे.

# तुमचे सिम हायजॅक झाले?

## तुम्हाला हे संकेत मिळाले तर समजून घ्या की तुम्ही सिम स्वॅप घोटाळ्याचे झालात बळी!

**सायबर गुन्हे वेगाने वाढत आहेत. नवीन पद्धती वापरून लोकांची फसवणूक केली जात आहे. आता, सिम स्वॅप नावाचा घोटाळा समोर आला आहे. यामध्ये, फसवणूक करणारे तुमचा मोबाईल नंबर चोरतात. यामुळे तुमची बँकिंग, ईमेल आणि इतर माहिती धोक्यात येते. कल्पना करा की एके दिवशी सकाळी उठल्यावर तुमच्या फोनवर मेसेज किंवा कॉल येत नाहीत. तुम्ही तुमचा फोन रीस्टार्ट करण्याचा प्रयत्न करता, पण काहीही घडत नाही. थोड्याच वेळात, तुम्हाला तुमच्या बँकेकडून एक ईमेल अलर्ट मिळतो की तुमच्या खात्यातून पैसे काढले गेले आहेत. याचा अर्थ तुम्ही सिम स्वॅप घोटाळ्याला बळी पडला आहात. सिम स्वॅप घोटाळ्याची चिन्हे आणि ते टाळण्यासाठी तुम्ही कोणते सुरक्षा उपाय करू शकता ते पाहूया...**

### सिम स्वॅप घोटाळा म्हणजे काय?

सिम स्वॅप घोटाळ्यात हॅकर्स तुमच्या फोन नंबरवर नियंत्रण ठेवतात. ते तुमचे कॉल, मेसेज आणि OTP इंटरसेप्ट करतात. OTP हे कोड आहेत जे ऑनलाइन अकाउंट सुरक्षित ठेवतात. एकदा त्यांच्याकडे नंबर आला की, फसवणूक करणारे पासवर्ड बदलू शकतात, ईमेल हॅक करू शकतात आणि बँकांमधून पैसे काढू शकतात. एकदा हॅकर्सनी तुमच्या नंबरवर ॲक्सेस मिळवला, की तुमचे बँक खाते सहजपणे रिकामे करू शकतात.

### सिम स्वॅप घोटाळा म्हणजे काय?

सिम स्वॅप घोटाळ्यात हॅकर्स तुमच्या फोन नंबरवर नियंत्रण ठेवतात. ते तुमचे कॉल, मेसेज आणि OTP इंटरसेप्ट करतात. OTP हे कोड आहेत जे ऑनलाइन अकाउंट सुरक्षित ठेवतात. एकदा त्यांच्याकडे नंबर आला की, फसवणूक करणारे पासवर्ड बदलू शकतात, ईमेल हॅक करू शकतात आणि बँकांमधून पैसे काढू शकतात. एकदा हॅकर्सनी तुमच्या नंबरवर ॲक्सेस मिळवला, की तुमचे बँक खाते सहजपणे रिकामे करू शकतात.

### काय कराल?

वैयक्तिक माहिती ऑनलाइन शेअर करू नका. अज्ञात लिंक्सवर क्लिक करू नका. तुमच्या बँक आणि ईमेल खात्यांवर लक्ष ठेवा. जर तुम्हाला कोणतीही असामान्य गतिविधी आढळली तर त्याची तक्रार करा. जर तुमचे नेटवर्क डाउन झाले तर तुमच्या कंपनीला ताबडतोब कळवा. तुम्ही जितक्या लवकर कारवाई कराल तितके कमी नुकसान होईल.





### हे संकेत ओळखा...

- फोन अचानक विनाकारण नेटवर्क सिग्नल गमावतो.
- सिम डिस्कनेक्ट झाले आहे आणि कॉल किंवा संदेश प्राप्त होत नाहीत.
- तुम्हाला पासवर्ड रीसेट अलर्ट मिळतो, परंतु तुम्ही त्यावर कारवाई करत नाही.
- तुम्हाला एक संशयास्पद लॉगिन सूचना मिळते.
- तुम्हाला असा संदेश मिळतो की तुमचे सिम दुसऱ्या डिव्हाइसवर सक्रिय केले गेले आहे.


### घोटाळा कसा सुरू होतो?

प्रथम, डिजिटल फसवणूक करणारे तुमचे नाव, पत्ता आणि जन्मतारीख यासारखी तुमची वैयक्तिक माहिती चोरतात. ही माहिती फिशिंग ईमेलद्वारे मिळवली जाते. हॅकर्स बनावट ग्राहक सेवा कॉल किंवा लीक झालेल्या डेटाबेसद्वारे देखील हे करू शकतात. त्यानंतर, फसवणूक करणारे ज्या कंपनीचे सिम कार्ड आहे त्या कंपनीशी संपर्क साधतात. ते तुमचा फोन हरवल्याचा दावा करून आणि नवीन सिमची विनंती करून तुमची ओळख करून देतात. कंपनी नवीन सिम सक्रिय करते. तुमचे जुने सिम निष्क्रिय केले जाते आणि तुमचा नंबर फसवणूक करणाऱ्याकडे हस्तांतरित केला जातो.

# चीनने तयार केला अफलातून रोबोट

## ८०% माणसासारखा, चेहऱ्यावरील हावभावांची करतो नक्कल!

**एकेकाळी चित्रपटांमध्ये दिसणारे रोबोट काल्पनिक वाटत असत, परंतु आता ते प्रत्यक्षात येत आहेत. खरं तर, चिनी इलेक्ट्रिक वाहन कंपनी Xpeng ने बुधवारी आपला नवीन आयर्न ह्युमनॉइड रोबोट लाँच केला. अहवालांनुसार हा रोबोट ८०% माणसासारखा आहे. खरं तर, तो पूर्णपणे माणसासारखा दिसतो आणि फिरतो. Xpeng ने त्याचे अनावरण केले, तेव्हा त्याने स्टेजवर माणसासारखा कॅटवॉक करून सर्वांना चकित केले. रोबोटची कृत्रिम बुद्धिमत्ता आणि बायोनिक तंत्रज्ञान भविष्यातील जगाची झलक दाखवते.**



### आयर्न रोबोट म्हणजे काय?

एक्सपेंगचा नवीन आयर्न रोबोट पूर्णपणे मानवीय डिझाइनवर आधारित आहे. तो १७८ सें.मी. उंच आणि ७० किलो वजनाचा आहे. कंपनीचे अध्यक्ष आणि सीईओ हे झियाओपेंग यांच्या मते, रोबोटची चाल अधिक मानवासारखी बनवण्यासाठी अभियंत्यांनी त्याच्या पायाच्या बोटांमध्ये हालचाली प्रणाली एकत्रित केल्या आहेत. यामुळे त्याची चाल हलकी आणि संतुलित दिसते. शिवाय, रोबोटमध्ये बायोनिक स्पाइन, लवचिक स्नायू आणि लवचिक त्वचा आहे. उल्लेखनीय म्हणजे, त्याच्या डोक्यावर ३D वक्र डिस्प्ले आहे, ज्यामुळे तो भावना व्यक्त करू शकतो. शिवाय, रोबोटचे हात २२ अंश स्वातंत्र्य वापरतात, ज्यामुळे तो मानवांप्रमाणेच लवचिक आणि नैसर्गिक पद्धतीने हालचाल करू शकतो.

### AI-शक्तीच्या मेंदूसह जबरदस्त प्रक्रिया

लोखंडी रोबोटमध्ये केवळ माणसासारखे शरीर नाही तर माणसासारखा मेंदू देखील आहे. या रोबोटमध्ये Xpeng च्या व्हिजन-लँग्वेज-ॲक्शन (VLA) मॉडेलची दुसरी पिढी आहे. कंपनीने ते स्वतःच्या तीन ट्युरिंग AI चिप्सने सुसज्ज केले आहे. हे रोबोटला २,२५० TOPS ची प्रोसेसिंग पॉवर मिळते. यामुळे आयर्न रोबोट बोलणे, चालणे, ओळखणे आणि संवाद साधणे यासारखी जटिल कामे करू शकतो. शिवाय, हा रोबोट सॉलिड-स्टेट बॅटरी वापरतो. Xpeng चे म्हणणे आहे की आयर्न रोबोट मानवांशी संवाद साधू शकतो आणि सहकार्याने कामही करू शकतो.

### २०२६ मध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादन

Xpeng चा आयर्न रोबोट सुरुवातीला व्यावसायिक वापरासाठी डिझाइन केला जाईल. कंपनीने रोबोटसोबत एक सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट किट देखील लाँच केले आहे. जगभरातील विकासक आता या रोबोटसाठी ॲप्लिकेशन बनवू शकतील. कंपनीचे म्हणणे आहे की पुढील वर्षी या रोबोटचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जाईल.






# सोशल मीडियावर जास्त सक्रिय असाल तर व्हा सावध

**आजकाल प्रत्येकजण सोशल मीडिया वापरत आहे. परंतु काही लोक त्याचा अतिवापर करत आहेत. ते त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण कॅप्चर करतात आणि सोशल मीडियावर पोस्ट करतात. परंतु बरेच हॅकर्स तुमची फसवणूक करण्यासाठी या माहितीचा वापर करू शकतात. ते तुमच्या सोशल मीडिया अकाउंटमधून अगदी लहान तपशील देखील गोळा करतात. नंतर, ते तुमची फसवणूक करण्यासाठी या माहितीचा वापर करतात. ते तुमच्या नावाने वेगळे आयडी तयार करतात आणि लोकांना फसवतात, बनावट लिंक पाठवतात. सुरक्षित राहण्यासाठी तुम्ही कोणती पावले उचलली पाहिजेत ते जाणून घेऊया...**

- गोपनीयता सेटिंग्ज बदला : तुमच्या अकाउंट सेटिंग्जमध्ये जा. तुमचे सार्वजनिक प्रोफाइल खाजगी करा. इतरांना कोणत्या पोस्ट, लाईव्ह स्ट्रीम, फोटो किंवा व्हिडिओ दाखवायचे ते निवडा. फेसबुकचे प्रायव्हसी चेकअप आणि ऑफ-फेसबुक ॲक्टिव्हिटी टूल्स वापरा. ॲप्स आणि गेममधून डेटा शेअरिंग प्रतिबंधित करा.
- पासवर्ड मॅनेजर वापरा : एकाधिक ठिकाणी एकच पासवर्ड वापरू नका. प्रत्येक खात्यासाठी एक अद्वितीय आणि मजबूत पासवर्ड तयार करा. पासवर्ड मॅनेजरद्वारे सर्वकाही व्यवस्थापित करा.



- मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन सक्षम करा : हॅकर्सपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी, मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशनने तुमचे खाते सुरक्षित करा. सेटिंग्जच्या सुरक्षा विभागात जा. ॲप किंवा हार्डवेअर की वापरून ते सक्षम करा. प्रत्येक लॉगिनसाठी कोड किंवा डिव्हाइस आवश्यक असेल, परंतु ते तुमचा डेटा सुरक्षित ठेवेल.
- जुनी खाती हटवा : जुनी खाती ठेवणे धोकादायक आहे. स्कॅमर अकाउंट हॅक करतात आणि झोम्बी अकाउंट तयार करतात. ते फोटो आणि व्हिडिओ वापरून बनावट वस्तू विकतात किंवा मित्रांना फिशिंग लिंक्स पाठवतात. डिलीट करण्यापूर्वी कंटेंट डाउनलोड करा.
- सोशल मीडियापासून अशा प्रकारे दूर रहा : जर तुम्हाला जास्त शेअरिंगची सवय असेल, तर सुरक्षित मेसेजिंग ॲप्स वापरा. तुमचे विचार आणि मीम्स iOS Notes ॲपमध्ये ठेवा. काही लाईक्स किंवा थोड्या प्रसिद्धीसाठी तुमच्या गोपनीयतेचा त्याग करणे टाळा.

## शॉर्ट न्यूज

### डायलिसिसला दिलासा मिळणार

■ मुंबई : महापालिकेने रुग्णांना परवडणाऱ्या दरात डायलिसिस उपचार उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. शहरातील रुग्णालयांना सार्वजनिक-खासगी भागीदारीतील दहा डायलिसिस केंद्रांकडे रुग्ण पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या केंद्रांमध्ये एका सत्रासाठी २५० ते ५४० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. या केंद्रांच्या एकूण क्षमतेपैकी ४० टक्के जागा महापालिकेकडून पाठविण्यात येणाऱ्या रुग्णांसाठी राखीव असतील. मूत्रपिंडाच्या आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना या निर्णयामुळे दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

### उड्डाणपूल जानेवारीत खुला

पुणे : शहरातील विश्रांतवाडी चौकातील उड्डाणपुलाचे काम जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महापालिकेने निश्चित केले आहे. आतापर्यंत या कामाचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. चौकातील काही बांधकामे हटविण्याच्या प्रक्रियेमुळे उर्वरित कामाला विलंब होत आहे. उड्डाणपुलासोबतच चौकात ग्रेड सेपरेटरचे कामही सुरू आहे. ग्रेड सेपरेटर मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. हे दोन्ही प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर विमानतळाकडे जाणाऱ्या प्रवाशांसह वाहनचालकांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे.

### गोदावरी प्रदूषणावर कारवाई

नाशिक : गोदावरी नदी आणि उपनद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. प्रक्रिया न केलेले सांडपाणी नदीत सोडणाऱ्या औद्योगिक कंपन्यांवर कारवाई करण्याचे आदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाला देण्यात आले आहेत. गोदावरी, नंदिनी नदी आणि इतर संशयित ठिकाणांवरील पाण्याचे नमुने तपासले जाणार आहेत. प्रदूषण करणाऱ्या उद्योगांची यादी तयार करून संबंधित मालकांची जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर दंडात्मक कारवाईसह प्रसंगी कारखाने बंद करण्याचेही निर्देश आहेत. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गोदावरी स्वच्छ करण्यासाठी प्रशासनाने हालचाली वेगवान केल्या आहेत.

# दिवाळी पाडवा : नात्यांचा गोडवा, समृद्धीचा नवा संकल्प!

## प्रेम, विश्वास आणि आपुलकीच्या नात्यांना नव्याने उजाळा देणारा मंगलमय दिवस!

दिवाळी म्हणजे आनंदाचा उत्सव, प्रकाशाचा सोहळा आणि नात्यांमधील प्रेमाचा सुगंध! दीपोत्सवातील प्रत्येक दिवसाला स्वतंत्र महत्त्व आहे. त्यात कार्तिक शुद्ध प्रतिपदेचा दिवाळी पाडवा हा दिवस नव्या आशा, नव्या संकल्पना आणि नव्या सुरुवातीचा संदेश घेऊन येतो. घराघरांत दिव्यांची रोषणाई, अंगणात रांगोळ्या, फराळाचा दरवळ आणि आप्तस्वकीयांच्या भेटीगाठी अशा आनंदी वातावरणात पाडव्याचे स्वागत केले जाते.

दिवाळी पाडवा हा पती-पत्नीच्या नात्यातील प्रेम, विश्वास आणि सहजीवनाचे प्रतीक मानला जातो. पत्नी पतीला औक्षण करते, तर पती पत्नीला भेटवस्तू देऊन तिच्याप्रती असलेला आदर आणि प्रेम व्यक्त करतो. संसाराच्या प्रवासात एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा आणि प्रत्येक परिस्थितीत एकमेकांना साथ देण्याचा संकल्प या दिवशी अधिक दृढ होतो. संसार सुंदर होतो तो केवळ संपत्तीने नाही, तर परस्परांतील समजूतदारपणा, त्याग आणि विश्वासाने!



व्यापारी वर्गासाठीही या दिवसाला विशेष महत्त्व आहे. अनेक व्यापारी बांधव नवीन हिशेबाच्या वह्यांचे पूजन करून आर्थिक वर्षाची सुरुवात करतात. मागील वर्षातील अनुभवांची शिदोरी घेऊन नव्या वर्षात प्रगती करण्याचा संकल्प केला जातो. व्यवहारातील प्रामाणिकपणा, ग्राहकांचा विश्वास आणि मेहनतीच्या बळावर यशाची नवी शिखरे गाठण्याची प्रेरणा या दिवसातून मिळते.

पाडव्याच्या सणाला बळीराजाच्या परंपरेचीही जोड आहे. दानशूरपणा, लोककल्याण आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून बळीराजाकडे पाहिले जाते. 'इडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो' ही भावना आजही ग्रामीण महाराष्ट्राच्या मनामनांत रुजलेली आहे. शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य माणसाच्या जीवनात सुखाचे दिवस यावेत, हीच या परंपरेमागील भावना आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात पाडव्याचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले असले तरी माणसामाणसांतील संवाद कमी होत चालला आहे. नात्यांमधील जिव्हाळा टिकवण्यासाठी एकमेकांना वेळ देणे, मनमोकळेपणाने बोलणे आणि अडचणीच्या काळात आधार बनणे गरजेचे आहे. आपल्या आनंदात समाजातील गरजू आणि वंचितांचाही सहभाग असावा. एखाद्याच्या आयुष्यात आनंदाचा छोटासा दिवा लावता आला, तर तीच दिवाळीची खरी सार्थकता ठरेल.

खरी समृद्धी केवळ पैसा, संपत्ती किंवा मोठ्या घरात नसते. घरातील ज्येष्ठांचे आशीर्वाद, मुलांचे हसू, कुटुंबातील समाधान आणि संकटात पाठीशी उभे राहणारी माणसे हीच आयुष्याची खरी श्रीमंती आहे. पैसा सुविधा देऊ शकतो; मात्र प्रेम, आपुलकी आणि मानसिक समाधान माणसांशी जोडलेल्या नात्यांतूनच मिळते.

चला, या दिवाळी पाडव्याला मनातील कटुता, गैरसमज आणि अहंकार बाजूला ठेवूया. नात्यांना नव्याने उजाळा देऊया, माणुसकीचा दिवा तेवत ठेवूया आणि आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेऊया. प्रत्येकाच्या आयुष्यात आरोग्य, समाधान, सुख आणि समृद्धी नांदू दे, हीच मनापासून प्रार्थनाकारण खरी दिवाळी घरात दिवे लावण्यात नाही, तर दुसऱ्याच्या आयुष्यात आशेचा प्रकाश निर्माण करण्यात आहे. नात्यांचा गोडवा जपूया आणि समृद्धीचा नवा संकल्प करूया!

# कळसपिंपरीत भवार कुटुंबाच्या घरी पिठलं-भाकरीचा आस्वाद

## ग्रामस्थांशी संवाद साधत समस्यांवर कार्यवाहीच्या सूचना

**पाथर्डी : प्रतिनिधी**

दुष्काळाच्या झळांनी शेतकरी कुटुंबांच्या घरातील दिवाळीचा आनंद काहीसा हिरावून घेतला आहे. शेतातील उभ्या पिकांची चिंता, पाण्याची टंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि आर्थिक विवंचना अशा अनेक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी कळसपिंपरी येथील भिवसेन शंकर भवार या शेतकऱ्याच्या घरी दिवाळी साजरी केली. शेतकरी कुटुंबासोबत जमिनीवर बसून पिठलं-भाकरीच्या जेवणाचा आस्वाद घेत त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. संकटाच्या प्रसंगी सरकार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, हा विश्वास देण्यासाठी आपण आलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



मंत्री विखे पाटील यांनी कळसपिंपरी येथील ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. लहान मुलांना मिठाई आणि फटाक्यांचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविला. उपस्थित महिला आणि युवकांची आस्थेने विचारपूस करून त्यांनी मांडलेल्या प्रश्नांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या. यावेळी आमदार मोनिका राजळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

भवार कुटुंबीयांच्या घरी मंत्री विखे पाटील यांनी पणती पेटवून दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. पारंपरिक पद्धतीने त्यांचे औक्षण करण्यात आले. सोबत आणलेले कपडे आणि मिठाई त्यांनी कुटुंबातील लाडक्या बहिणीला भेट दिली. मुलांच्या शिक्षणाबरोबरच शेती व्यवसायाचीही त्यांनी माहिती घेतली. भवार कुटुंबीयांनी केलेल्या पिठलं-भाकरीच्या जेवणाचा त्यांनी सर्व शासकीय सोपस्कार बाजूला ठेवत जमिनीवर बसून आस्वाद घेतला. या अनौपचारिक भेटीमुळे शेतकरी कुटुंबीयांनाही आपलेपणाची भावना अनुभवता आली. दुष्काळाची दाहकता लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जमा केली आहे. यापूर्वी कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला असून अनेक वर्षांपासून थकलेली वीजबिलेही माफ करण्यात आली आहेत. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून मुख्यमंत्री आणि सरकारमधील सर्व मंत्री या संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या सोबत आहेत, हा विश्वास देण्यासाठी आपण आलो असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. गावातील पाणीटंचाईचा प्रश्न ग्रामस्थांनी मांडल्यानंतर मंत्री विखे पाटील यांनी ग्रामस्थांसमोरच जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दूरध्वनी करून आवश्यक सूचना दिल्या. गावातील पाणी योजनेवर फिल्टर प्लांट बसविण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. चारा उत्पादनाबाबत प्रशासकीय स्तरावर नियोजन करण्यात आले असून शेतकऱ्यांना मदत करताना शासन कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## वाचकांच्या लेखणीतून

### कुछ लोग ज़माने में ऐसे भी होते हैं



**ज़माना हा मूलतः अरबी भाषेचा शब्द आहे. त्याचा अर्थ काळ, अवधी, जगात राहणारे लोक असा होतो. ज़माना या शब्दाचे अनेकवचन अज़्मिना असे होते. ज़माना हा शब्द हिंदी आणि मराठी, गुजराती अशा प्रांतीय भाषांतूनही तो मूळ अर्थाप्रमाणेच वापरला जातो. ज़माना असा नुक़्तायुक्त शब्द न राहता तेथे जमाना असाच उच्चार किंवा लेखन होते, एवढेच.**

**ज़माना हा शब्द ऐकण्यास मधुर वाटतो. उर्दू भाषेत त्याचे नुक़्तायुक्त लेखन व उच्चारण होते. अर्थही मुळाप्रमाणेच होतो. ज़माना शब्दावरुन उर्दू भाषेत फार सुंदर शेर आढळतात.**

**ज़माने से हम नहीं, हमसे ज़माना है या विचारसरणीचे शायर सीमाब म्हणतात,**

**अब मुझको है क़रार तो सबको है क़रार है।**
**दिल क्या ठहर गया की ज़माना ठहर गया।।**

**मला शांती तर साऱ्यांना शांती. हृदयाची धडधड थांबणे म्हणजे जगाचे चलनवलन थांबणे होय.**

**जिगर मुरादाबादी हे शायर दार्शनिक अंगाने विचार करताना म्हणतात,**

**किसका ख़याल, कौन सी मंज़िल नज़र में है।**
**सदियां गुज़र गई कि ज़माना सफ़र में है।।**

**या जगाचा जीवनाबद्दल काय विचार आहे, काय ध्येय आहे काही कळत नाही. किती शतके निघून गेली तरीही जमाना अजून वाटचाल करतोच आहे.**

**फ़िराक गोरखपुरी ते शृंगार रसाची उधळण करीत म्हणतात,**

**हज़ार बार ज़माना इधर से गुज़रा है।**
**नई नई सी है कुछ तेरी रहगुज़र फिर भी।।**

**हजारो वेळा लोक इकडून आलेगेले आहेत. तरी पण तू ज्या ज्या वेळेस या रस्त्याने येतेजातेस तेव्हा तेव्हा तुझे येणेजाणे नित्य नवे वाटते.**

**इश्क मोहब्बतीची किंवा प्रीतीची कहाणी कधी संपत नाही. हे आपल्या मनावर ठसवताना एक शायर म्हणतात,**

**ज़माना बड़े शौक से सुन रहा था।**
**हमीं सो गए दास्तां कहते कहते।।**

**जमाना कान देऊन ऐकत होता. पण आम्हीच कहाणी सांगता सांगता निद्रिस्त झालो.**

**जगात किती विविध प्रकारचे लोक असतात! काही लोक आपले दुःख जगाला दाखवीत नाहीत. वरकरणी आम्ही फार खूश आहोत असे भासवितात. म्हणून एक शायर वर्णन करतात,**

**कुछ लोग ज़माने में ऐसे भी होते हैं।**
**महफ़िल में जो हंसते हैं तनहाई में रोते हैं।।**

**खुशीच्या प्रसंगी लोक हसण्याचा आविर्भाव आणतात. पण एकान्तात अश्रू ढाळतात. जगात असेही काही लोक असतात.**



**नाना ढवळे,**
८२८६९१३२२३, निघोज,
ता. पारनेर, जि. अहिल्यानगर.

# मोबाईलला फाटा देत चिमुकल्यांनी साकारला तोरणा किल्ला!

## महादेव गल्लीतील मुलांची कल्पकता अन् जिद्दीला सलाम

**पारनेर : प्रतिनिधी**

मोबाईलच्या आहारी जाणाऱ्या बालपिढीबाबत चिंता व्यक्त होत असताना पारनेर शहरातील महादेव गल्लीतील चिमुकल्यांनी मात्र आपल्या कल्पकतेतून आणि जिद्दीतून एक वेगळाच आदर्श निर्माण केला आहे. कोणतीही स्पर्धा नाही, शाळेचा उपक्रम नाही की मोठ्यांचे मार्गदर्शन नाही, तरीही केवळ ऐतिहासिक किल्ल्यांविषयीची आवड आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची प्रेरणा घेऊन या मुलांनी तोरणा किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती साकारली आहे. इयत्ता सहावीत शिकणाऱ्या अभिराज संदीप सोनवणे पाटील याने या उपक्रमात पुढाकार घेतला असून, त्याच्या कल्पकतेला मित्रांनीही उत्स्फूर्त साथ दिली.

### प्रत्यक्ष किल्ला पाहिल्यानंतर मनात रुजली कल्पना

अभिराजने वडिलांसोबत प्रत्यक्ष तोरणा किल्ल्याला भेट दिली होती. तेथील भव्य तटबंदी, बुरुज आणि ऐतिहासिक वास्तू पाहिल्यानंतर त्याच्या मनात किल्ल्याची प्रतिकृती तयार करण्याची कल्पना रुजली. 'आपणही आपल्या गल्लीत तोरणा किल्ला उभारायचा,' असा निर्धार त्याने केला. त्यानंतर त्याने गल्लीतील मित्रांना सोबत घेतले आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. मित्रांनी परिसरातून माती गोळा केली, काही पोती दगड आणले, रंगांची व्यवस्था केली आणि मावळ्यांच्या मूर्ती जमविल्या. महादेव गल्लीतील गाड्या लावण्यासाठी असलेल्या मोकळ्या जागेत या चिमुकल्यांनी आपल्या कल्पकतेला आकार देत किल्ल्याची उभारणी केली. विशेष म्हणजे, किल्ल्याची रचना करताना प्रत्येक बारकाव्याचा विचार करण्यात आला.

### मावळे, विहीर अन् कोळंबा गावाचीही मांडणी

किल्ल्याला अधिकाधिक वास्तववादी स्वरूप देण्यासाठी मुलांनी रांगोळीचे रंग वापरून सजावट केली. किल्ल्यावर मावळ्यांच्या मूर्ती मांडण्यात आल्या, तसेच विहिरीची निर्मिती करण्यात आली. कोळंबा गावाचीही प्रतिकृती साकारण्यात आली. किल्ल्याच्या मध्यवर्ती ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती स्थापन करण्यात आली. त्यामुळे संपूर्ण प्रतिकृतीला ऐतिहासिक वातावरणाची अनुभूती मिळत आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी स्वराज्याचे तोरण बांधत जिंकलेला हा पहिला किल्ला मानला जातो. त्यामुळेच त्याला 'तोरणा' हे नाव पडले असून, प्रचंडगड या नावानेही तो प्रसिद्ध आहे. अभिराजला या किल्ल्याचा इतिहास आणि त्याचे महत्त्व याची चांगली माहिती आहे.

### नगरसेवक शेलार यांच्या हस्ते उद्घाटन

या किल्ल्याच्या प्रतिकृतीचे उद्घाटन गल्लीतील नगरसेवक भूषण (दादा) शेलार यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थितांना तोरणा किल्ल्याचा इतिहास आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची माहिती सांगितली. यावेळी बोलताना शेलार म्हणाले, ₹हल्ली मुले मोबाईलमध्ये गुंतलेली दिसतात. मात्र, कोणाचेही मार्गदर्शन नसताना, कोणतीही स्पर्धा किंवा शाळेचा उपक्रम नसताना या मुलांनी स्वतःहून पुढाकार घेत अशी सुंदर कलाकृती साकारली, ही खरोखरच कौतुकास्पद बाब आहे. मुलांमधील ही कल्पकता आणि ऐतिहासिक वारशाबद्दलची आवड निश्चितच प्रेरणादायी आहे.

### इतिहास मुलांपर्यंत पोहोचवा!

सुट्टीच्या काळात मुलांना केवळ इकडे-तिकडे फिरवण्यापेक्षा पालकांनी त्यांना ऐतिहासिक गडकिल्ल्यांची प्रत्यक्ष सफर घडवावी. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सांगावा. यातून मुलांमध्ये नवी प्रेरणा आणि ऊर्जा निर्माण होईल. मुलांनीही मोबाईलमध्ये वेळ घालवण्याऐवजी अशा कलाकृती साकारण्याचा प्रयत्न करावा. त्यातून मिळणारा निर्मितीचा आनंद वेगळाच असतो आणि मुले मोबाईलपासूनही दूर राहू शकतात, असे आवाहन नगरसेवक भूषण शेलार यांनी केले.

### मित्रांच्या सहकार्याने उपक्रम यशस्वी

या उपक्रमात अभिराज सोनवणे पाटील याच्यासोबत धनुष शिंगवी, शिवम् औटी, श्री ठुबे, राजवीर कार्ले आणि राधा सोनवणे यांनीही मोलाचे योगदान दिले. यावेळी संदीप सोनवणे, वैभव येणारे उपस्थित होते. गल्लीतील नागरिकांसह ये-जा करणाऱ्या अनेकांनी या किल्ल्याची प्रतिकृती पाहून मुलांचे भरभरून कौतुक केले. लहान वयातच इतिहासाची आवड, सांघिक भावना आणि सर्जनशीलतेची जोड देणाऱ्या या चिमुकल्यांच्या उपक्रमाचे परिसरात विशेष कौतुक होत आहे.

# इमारतीला भीषण आग

ठाणे : ठाण्यातील तीन हात नाका परिसरातील रहेजा गार्डन गृहसंकुलातील कारलास सोसायटीच्या आठव्या मजल्यावर रविवारी भीषण आग लागली. आगीने काही वेळातच चौदाव्या मजल्यापर्यंत मजल मारल्याने रहिवाशांमध्ये घबराट पसरली. अग्निशमन दल आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. अग्निशमन जवानांनी अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेत इमारतीतील चार रहिवासी होरपळले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी भेट दिली असून आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

पान ४ वरून...

### दीपावलीच्या खरेदीत 'परिधान'चा बोलबाला

अनुभवाला बाजार समितीचे सभापती गंगारामशेठ बेलकर यांचे व्यावसायिक मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. बाळुशेठ यांना खंबीर साथ देणारे दुसरे संचालक पंकजशेठ बेलकर यांच्या सहभागातून या वस्त्रदालनाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली.

**माफक दर, दर्जेदार वस्त्रांमुळे ग्राहकांचा विश्वास :** व्यवसायाच्या सुरुवातीपासूनच ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत चांगल्या दर्जाची वस्त्रे उपलब्ध करून देण्यावर परिधान कलेक्शनने भर दिला. ग्राहकांच्या गरजा आणि पसंती लक्षात घेऊन वस्त्रांची निवड करण्याच्या या पद्धतीमुळे दालनाने ग्राहकांचा विश्वास संपादन केला. त्यामुळे दरवर्षी सणासुदीच्या काळात येथे खरेदीसाठी ग्राहकांची पसंती वाढताना दिसते.

यंदाही पंधरा दिवसांत प्रतिसादाची पुनरावृत्ती : यंदाच्या दीपावली खरेदीतही परिधान कलेक्शनला मिळालेला प्रतिसाद त्याच विश्वासाची साक्ष देणारा ठरला. केवळ आकर्षक वस्त्रसंग्रह नव्हे, तर माफक दर आणि दर्जेदार वस्त्रांची सांगड घालण्याच्या प्रयत्नांना ग्राहकांनी पसंती दिली. ग्राहकांचा हा वाढता प्रतिसाद म्हणजे सातत्यपूर्ण व्यावसायिक प्रयत्नांना मिळालेली पावती असल्याची भावना संचालकांनी व्यक्त केली.

### निघोजमध्ये नवागतांचा जल्लोष!

कार्यक्रमात नवोदित विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, अभिनय आणि व्यासपीठावरील सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या नवागत मिस फ्रेशर-मिसेस फ्रेशर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्वाची छाप पाडली. बी. फार्मसी विभागातून तेजस लंके याची नवागत मिस फ्रेशर, तर राजनंदिनी गायखे हिची नवागत मिसेस फ्रेशर म्हणून निवड झाली. डी. फार्मसी विभागातून संचीत कुरुंदळे याने नवागत मिस फ्रेशर, तर वैष्णवी ढवण हिने नवागत मिसेस फ्रेशरचा मान पटकावला. विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**विद्यार्थ्यांनी संस्कार आणि शिस्त जपावी :** संस्थेचे अध्यक्ष आर. के. वराळ यांनी महाविद्यालयाची खरी ताकद विद्यार्थी असून त्यांनी शिक्षणासोबत संस्कार आणि शिस्तही जपावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. संस्थेचे सचिव विराज वराळ पाटील यांनी लवकरच महाविद्यालयात पदव्युत्तर औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

**फार्मसी म्हणजे रुग्णसेवेची जबाबदारी :** प्राचार्य डॉ. कुलदीप वैद्य यांनी औषधनिर्माणशास्त्राचे शिक्षण ही केवळ पदवी मिळविण्याची प्रक्रिया नसून रुग्णसेवेची मोठी जबाबदारी असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच प्रात्यक्षिक ज्ञानावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# लोकसहभागातून रेनवडीचा विकासाचा झेंडा

## नाशिक विभागात द्वितीय क्रमांक!; मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात ८० लाखांचे घवघवीत यश

**पाथर्डी : प्रतिनिधी**

ग्रामीण विकास, लोकसहभाग आणि पारदर्शक प्रशासनाच्या बळावर पारनेर तालुक्यातील रेनवडी ग्रामपंचायतीने विकासाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ मध्ये रेनवडी ग्रामपंचायतीने नाशिक विभागात द्वितीय क्रमांक पटकावला असून, तब्बल ८० लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला आहे. शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग आणि विकासकामांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन या त्रिसूत्रीच्या जोरावर मिळविलेल्या या यशामुळे पारनेर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्याच्या नावलौकिकात भर पडली आहे.




### विविध निकषांवर उल्लेखनीय कामगिरी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध निकषांच्या आधारे ग्रामपंचायतींचे मूल्यमापन करण्यात आले. यामध्ये सुशासनयुक्त गाव, लोकाभिमुख प्रशासन, सक्षम पंचायत, लोकवर्गणी, जलसमृद्धी, स्वच्छता, हरित गाव, पर्यावरण संवर्धन, मनरेगाअंतर्गत रोजगारनिर्मिती, आजीविका विकास, सामाजिक न्याय आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी अशा महत्त्वपूर्ण क्षेत्रांचा समावेश होता. या सर्व क्षेत्रांत रेनवडी ग्रामपंचायतीने केलेल्या कामाची दखल घेत विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक देण्यात आला.

### सामूहिक प्रयत्नांचे यश

या यशामध्ये सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी, विविध समित्यांचे पदाधिकारी, महिला बचत गट आणि समस्त ग्रामस्थांचा मोलाचा वाटा आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने आपापली जबाबदारी पार पाडत एकजुटीने केलेल्या प्रयत्नांना या पुरस्काराच्या रूपाने यश मिळाले आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषदेने ग्रामीण विकासाच्या विविध उपक्रमांमध्ये यापूर्वीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यात आता रेनवडी ग्रामपंचायतीच्या यशाची भर पडली आहे. विभागीय स्तरावर मिळालेल्या या पुरस्कारामुळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळण्याबरोबरच आगामी काळातील विविध विकासकामांसाठी ८० लाख रुपयांचे बळ उपलब्ध होणार आहे. या निधीतून गावातील पायाभूत सुविधा आणि अन्य विकासकामांना अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हा परिषद प्रशासन, पंचायत समिती पारनेर तसेच ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. लोकसहभाग, पारदर्शक कारभार आणि विकासाचा सामूहिक ध्यास असेल, तर ग्रामीण भागातील गावेदेखील विकासाचा आदर्श निर्माण करू शकतात, हे रेनवडी ग्रामपंचायतीने या यशातून दाखवून दिले आहे.

### सक्रिय सहभागाचा निर्धार

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने ११ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या निकषांमध्ये बदल करून नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे. या नव्या निकषांनुसार राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० मध्येही रेनवडी ग्रामपंचायतीने सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार केला आहे. यासंदर्भात आयोजित बैठकीत ग्रामस्थ आणि पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे पुढील टप्प्यातही विकासकामांची गती कायम ठेवण्याचा संकल्प केला.

### लोकसहभागाला प्राधान्य

गावाच्या विकासासाठी केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता लोकसहभाग, श्रमदान आणि सामूहिक प्रयत्नांना प्राधान्य देण्याचे धोरण रेनवडी ग्रामपंचायतीने स्वीकारले. महिला बचत गटांचा सक्रिय सहभाग, ग्रामस्थांचे सहकार्य, विविध ग्रामस्तरीय समित्यांचे योगदान आणि विकासकामांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन यामुळे अभियानातील विविध निकषांची पूर्तता करणे शक्य झाले. प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यातील समन्वयातून गावाच्या विकासाला गती मिळाली.

# गोरेगावात पैठणीचा खेळ, बक्षिसांची रेलचेल!

## सभापती बाबासाहेब तांबे सोशल फाऊंडेशनतर्फे 'होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा

### पाचव्या वर्षाचे आयोजन

**गोरेगाव : प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी जपत धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या मा. सभापती बाबासाहेब तांबे सोशल फाऊंडेशनच्या वतीने यंदाही महिलांसाठी 'होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे यंदा पाचवे वर्ष असून, मंगळवार, दि. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता श्री क्षेत्र गोरेश्वर मंदिर, गोरेगाव येथे हा आनंदसोहळा रंगणार आहे. जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण समारंभ पार पडणार असल्याची माहिती फाऊंडेशनचे सचिव संदीप तांबे यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाबासाहेब तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली फाऊंडेशनच्या विविध उपक्रमांचे नियोजन केले जाते. केवळ कार्यक्रमांचे आयोजन न करता त्यामध्ये शिस्त, नियोजन, सामाजिक सहभाग आणि नावीन्यपूर्ण संकल्पना यांचा समन्वय साधण्यावर फाऊंडेशनचा विशेष भर असतो. त्यामुळे फाऊंडेशनच्या प्रत्येक उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

महिला भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, शेती, कुटुंब आणि दैनंदिन धावपळीतून त्यांना विरंगुळ्याचे क्षण मिळवून देणे, त्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि महिलांमधील स्नेहभाव वृद्धिंगत करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

यंदाच्या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे प्रसिद्ध अभिनेते ओम यादव यांचे खुमासदार सूत्रसंचालन. विविध मनोरंजक खेळ, पैठणीसह आकर्षक संसारोपयोगी बक्षिसे आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रमाची रंगत अधिक वाढणार आहे.

फाऊंडेशनच्या वतीने वर्षभर राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये स्थानिक नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा ठरत आहे. यंदाच्या पाचव्या वर्षाच्या आयोजनालाही त्यामुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी फाऊंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवक विशेष परिश्रम घेत आहेत. गोरेगावसह परिसरातील महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आनंदसोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पैठणीसह आकर्षक बक्षिसांची लयलूट!

'होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा' या कार्यक्रमात महिलांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्या महिलांना सोन्याची नथ,पैठणीसह आकर्षक संसारोपयोगी बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रसिद्ध अभिनेते ओम यादव यांच्या खुमासदार सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमात हास्य-विनोद आणि मनोरंजनाची रंगत अनुभवायला मिळणार आहे.




### सहभाग नसलेल्या महिलांसाठीही लकी ड्रॉ!

कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रत्यक्ष खेळांमध्ये सहभागी न होणाऱ्या महिलांनाही बक्षीस जिंकण्याची संधी मिळणार आहे. लकी ड्रॉच्या माध्यमातून अशा महिलांना तब्बल ५० आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. त्यामुळे उपस्थित प्रत्येक महिलेसाठी हा आनंदाचा आणि उत्सुकतेचा सोहळा ठरणार आहे.

### महिलांनी स्वत:साठीही आनंदाचे क्षण जपावेत!

महिला ही कुटुंबाचा आधारस्तंभ असते. घरातील प्रत्येकाच्या आनंदासाठी ती अहोरात्र मेहनत घेत असते. मात्र, या सगळ्या जबाबदाऱ्या सांभाळताना स्वत:च्या आनंदासाठी वेळ देणे अनेकदा राहून जाते. महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, त्यांना आपल्या मैत्रिणींसोबत आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यातील उत्साहाला नवे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे गोरेगावातील सर्व महिला भगिनींनी घरातील कामांचा व्याप बाजूला ठेवून आपल्या मैत्रिणींसह या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहावे. विविध खेळांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घ्यावा आणि या आनंदसोहळ्याचा मनमुराद आनंद लुटावा.₹

**सौ. सुमन बाबासाहेब तांबे,** सरपंच, मॉडेल व्हिलेज गोरेगाव

# निघोजमध्ये नवागतांचा जल्लोष!

## नवयुथ स्वागत समारंभ 2026'मध्ये नवोदितांचे उत्साहात स्वागत

### बी. फार्मसी व डी. फार्मसीचे मिस फ्रेशर-मिसेस फ्रेशर घोषित

**निघोज : प्रतिनिधी**

सहकार महर्षी किसनराव वराळ पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, निघोज येथे आयोजित 'नवयुथ नवागत स्वागत समारंभ २०२६' हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. बी. फार्मसी आणि डी. फार्मसी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वरिष्ठ विद्यार्थ्यांनी गुलाबपुष्प देऊन आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. महाविद्यालयाचा परिसर आकर्षक सजावट आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहाने बहरला होता.

उर्वरीत पान ३ वर



### संघर्षातून उभे राहिले महाविद्यालय

कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. एस. के. वाघमारे यांनी केली. महाविद्यालय उभारताना आलेले संघर्ष आणि अडचणींचा प्रवास त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. संकटे आली तरी खचायचे नाही, हा महाविद्यालयाचा बाणा असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिव्या लोखंडे आणि साक्षी शेटे यांनी केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या मैत्रीच्या आणि आनंददायी आठवणींच्या सोबतीने 'नवयुथ स्वागत समारंभ २०२६'ची सांगता झाली.

# दीपावलीच्या खरेदीत 'परिधान'चा बोलबाला

## ग्राहकांचा विश्वास पुन्हा अधोरेखित; माफक दर आणि दर्जेदार वस्त्रांचा विश्वास

### पंधरा दिवसांच्या प्रतिसादातून पुन्हा अधोरेखित झाली लोकप्रियता

**पारनेर : प्रतिनिधी**

दीपावलीच्या पार्श्वभूमीवर वस्त्र खरेदीसाठी ग्राहकांची बाजारपेठेत मोठी लगबग पाहायला मिळाली. मात्र, या खरेदीच्या हंगामात चोखंदळ ग्राहकांनी पारनेर येथील 'परिधान कलेक्शन'ला दिलेली पसंती विशेष लक्षवेधी ठरली. गेल्या पंधरा दिवसांत या वस्त्रदालनाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, माफक दरात दर्जेदार वस्त्रे उपलब्ध करून देण्याच्या व्यावसायिक भूमिकेवर ग्राहकांचा विश्वास पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

उर्वरीत पान ३ वर

### अनुभव आणि नियोजनातून व्यवसायाची मुहूर्तमेढ

परिधान कलेक्शनचे संचालक बाळुशेठ शिंगवी यांनी वडील स्व. पोपटलाल शिंगवी यांच्या मार्गदर्शनाखाली व्यावसायिक क्षेत्रातील अनुभव संपादन केला. या

# ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय शिक्षणाचे दालन खुले!

## समर्थ इंजिनिअरिंग कॉलेजचा फिलिपिन्समधील कॅटबालोगन सिटी कम्युनिटी कॉलेजशी शैक्षणिक सामंजस्य करार

**कर्जुले हर्या : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे (ता. जुन्नर, जि. पुणे) या संस्थेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. फिलिपिन्समधील कॅटबालोगन सिटी कम्युनिटी कॉलेज आणि समर्थ कॉलेज यांच्यात नुकताच आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास आणि व्यावसायिक संधींचे नवे दालन खुले होणार आहे.

### शैक्षणिक प्रगतीतील महत्त्वपूर्ण टप्पा

फिलिपिन्समधील शैक्षणिक संस्थेशी झालेला हा सामंजस्य करार समर्थ संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शैक्षणिक वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार असून, जागतिक स्तरावरील ज्ञान, संशोधनाच्या संधी आणि व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्याचा मार्ग खुला होणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये जागतिक दृष्टिकोन, संवादकौशल्य, संशोधनवृत्ती आणि व्यावसायिक क्षमता विकसित करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके आणि कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत यांनी स्वागत केले. तसेच या उपक्रमासाठी पुढाकार घेणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले.

### संशोधन, परिषद आणि शैक्षणिक उपक्रमांना प्राधान्य

करारांतर्गत दोन्ही संस्थांमधील प्राध्यापकांना अल्पकालीन अध्यापनासाठी संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांसाठी एका सेमिस्टरपासून शैक्षणिक वर्षापर्यंतच्या कालावधीतील विद्यार्थी विनिमय कार्यक्रम राबविण्याचे नियोजन आहे. तसेच संयुक्त संशोधन प्रकल्प हाती घेणे, संशोधन निष्कर्षांची देवाणघेवाण करणे आणि आंतरराष्ट्रीय परिषद, कार्यशाळा व चर्चासत्रांचे आयोजन करण्यावर भर दिला जाणार आहे. दोन्ही संस्थांमधील शैक्षणिक जर्नल्स, संशोधन प्रकाशने, अध्यापन साहित्य आणि इतर शैक्षणिक साधनसामग्रीची देवाणघेवाणही केली जाणार आहे. त्यामुळे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील संशोधन व अध्यापन पद्धतींचा परिचय होण्यास मदत मिळणार आहे.




### औद्योगिक प्रशिक्षणासह कौशल्य विकासाच्या संधी

केवळ शैक्षणिक देवाणघेवाणीपुरता हा करार मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक विकासालाही त्यातून चालना मिळणार आहे. विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण, इंटर्नशिप, औद्योगिक भेटी आणि व्यावसायिक कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याचे नियोजन आहे. त्याचबरोबर दोन्ही देशांतील शैक्षणिक आणि सांस्कृतिक परंपरांची ओळख करून देण्यासाठी सांस्कृतिक देवाणघेवाणीचे उपक्रमही आयोजित केले जाणार आहेत.

### साडेपाच हजार विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूटची स्थापना २००७ मध्ये ग्रामीण भागातील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके, सचिव विवेक शेळके आणि विश्वस्त वल्लभ शेळके यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेल्या या शैक्षणिक चळवळीने अल्पावधीतच उल्लेखनीय प्रगती केली आहे. आज संस्थेच्या माध्यमातून १४ विविध प्रकारची महाविद्यालये कार्यरत असून, त्याद्वारे ५ हजार ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याबरोबरच त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्षम करण्याच्या दिशेने संस्थेचे प्रयत्न सुरू आहेत.

### विद्यार्थी, प्राध्यापकांची आंतरराष्ट्रीय स्तरावर देवाणघेवाण

या सामंजस्य करारावर फिलिपिन्स येथील कॅटबालोगन सिटी कम्युनिटी कॉलेजचे अध्यक्ष डॉ. निगेल एल. कॉर्नजो आणि समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे प्राचार्य प्रा. डॉ. नवनाथ नरवडे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी युवा शास्त्रज्ञ डॉ. प्रतीक मुणगेकर, प्रा. रतिलाल बाबेल, प्रा. तानाजी वामन, समर्थ कॉलेजचे प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. सचिन पोखरकर उपस्थित होते. या करारामुळे दोन्ही शैक्षणिक संस्थांमधील परस्पर सहकार्य अधिक दृढ होणार आहे. विद्यार्थी व प्राध्यापकांची आंतरराष्ट्रीय स्तरावर देवाणघेवाण, संयुक्त संशोधन प्रकल्प, शैक्षणिक संसाधनांची उपलब्धता आणि ज्ञानाची देवाणघेवाण यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन मिळणार आहे.